# वाली

चंद्रभागेच्या तीरावर
उभा विठ्ठल विटेवर
वाट पाहतो निरंतर
कधी भेटेल भक्तवर ||१||

संपे किती काळ न कळे
मात्र पितृ सेवा न सरे
पुंडलिका वेळ ना मिळे
विठ्ठला भेटणे न जमे ||२||

अंत माता पित्याचा झाला
दहनविधी आटोपला
विठ्ठल उभाच दिसला
पाहूनी भक्त ओशाळला ||३||

अरेरे मी केवढा पापी
म्हणे पोळत पश्चात्तापी
सोडी प्राण जशी आहुती
हरी दयाळू देई मुक्ति ||४||

मात्र प्रायश्चित्त म्हणूनी
युगे युगे उभाच हरी
भक्तांसाठी वाली होऊनी
जगाची माऊली बनूनी ||५||

– नारायण
१०/०४/२३